यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई–मेल E-mail : dir_sol@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (0253) 2230191

ऑनलाईन शिक्षण विद्याशाखा / School of Online Learning

जावक क्र. SOOL/2024/356 दिनांक: 03/10/2024

# परिपत्रक

सर्व बी. एड. अभ्यास केंद्राना कळण्यात येते की, स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग मार्फत शैक्षणिक वर्ष२०२४-२५ मध्ये माहे जानेवारी २०२५पासून **परसबाग प्रमाणपत्र शिक्षणक्रम** सुरु करण्यात येत आहे. प्रत्येकी ५० विद्यार्थी या प्रमाणे सदर प्रमाणपत्र शिक्षणक्रमाची पथदर्शी तुकडी सर्व बी. एड. अभ्यासकेंद्रांवर व इच्छुक असणाऱ्या इतर अभ्यासकेंद्रांवर दूरशिक्षण पद्धतीने राबविण्यात येणार आहे. या पथदर्शी तुकडीसाठी अभ्यासकेंद्र देण्यासंदर्भात विद्यापीठ नियमाप्रमाणे रू. ५०००/- शिक्षणक्रम मान्यता शुल्क न आकारता प्रत्येक अभ्यासकेंद्राकडून Google Form द्वारे माहिती मागविण्यात येणार आहे व त्या सोबत प्रत्येक अभ्यासकेंद्राकडून केवळ रू. २००/- प्रक्रिया शुल्क आकारले जाणार आहे. आपण आपल्या अभ्यासकेंद्राची नोंदणी पुढे दिले https://forms.gle/RszJ5QMbxfLwZMRM6 या Google Form Link द्वारे करावी. सदर Google Form Link आपल्या सोयीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करू न देण्यातआली आहे.

सदर प्रमाणपत्र शिक्षणक्रमासाठी प्रवेश पात्रता १२ उत्तीर्ण/समकक्ष परीक्षा उत्तीर्ण अशी असणार आहे. त्यासंदर्भात आपल्या अभ्यासकेंद्रावरील बी. एड . प्रशिक्षणार्थी, आपल्या महाविद्यालयातील इतर पारंपारिक पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांसाठी प्रवेशित विद्यार्थीयांना अवगत करावे आणि या प्रमाणपत्र शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेण्यास इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी आपल्या स्तरावर तयार करावी. जेणे करूनऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु होताच आपल्याला हे सर्व प्रवेश निश्चित करणे सोयीचे होईल.

**(दिलीप भरड)**
**कुलसचिव**

**प्रत: माहितीसाठी**

- मा. कुलगुरू कार्यालय
- मा. प्र. कुलगुरू कार्यालय
- सर्व विभागीय केंद्रे
- विद्यापीठाशी संलग्न सर्व अभ्यास केंद्रे